**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १० नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचं संकल्पपत्र अमित शाह यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध; १ लाखांहून अधिक सरकारी नोकऱ्या देण्याचं आश्वासन.**
2. **महिला, शेतकरी आणि तरुणांसाठी पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत जाहीर.**
3. **जातिवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर राहण्याचं भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं राळेगावच्या प्रचार सभेत आवाहन.**

**आणि**

4. **टपाल खात्याद्वारा निवृत्तीवेतन धारकांना घरपोच जीवन प्रमाणपत्र अर्थात हयातीचा दाखला देण्याची सुविधा सुरू.**

**आता सविस्तर बातम्या .......**

भाजप जाहीरनामा

भाजपचा जाहीरनामा- 'संकल्पपत्र' नावानं आज मुंबईत ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आला. महाराष्ट्रात कौशल्य जनगणना करणार, ज्येष्ठ नागरिकांसाठी सेवा धोरण आणणार, महाराष्ट्राला AI आणि फिटनेस हब बनवणार, लाडकी बहिण योजनेचे पैसे दरमहा १५०० हून २१०० रुपये करणार, १ लाखांहून अधिक सरकारी नोकऱ्या देणार, जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवणार, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणार, नव उद्योजकांना १५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज देणार तसंच एकूण २५ लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवणार आदी आश्वासने यात देण्यात आली आहेत. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर्सची बनवून देशातील क्रमांक एकचं राज्य बनविण्याचा भारतीय जनता पार्टीचा संकल्प आहे. हे संकल्प पत्र विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप असल्याचं अमित शाह यावेळी म्हणाले.

***(होल्ड बाईट - ३२ सेकंद - अमित शहा)***

***महाराष्ट्र में जब जब युती की सरकार आती है, भाजपा के नेतृत्व में सरकार बनती है, महाराष्ट्र आगे बढता हुआ दिखायी पडता है. महाराष्ट्र के युवाओं को आगे बढाने के लिये महाराष्ट्र को राष्ट्र का, देश का प्रमुख राज्य बनाने के लिये और हर क्षेत्र में देश में महाराष्ट्र को सर्वोत्तम बनाने के लिये यह अपील करने आया हूँ, महाराष्ट्र की जनता को कि आप मोदी जी के नेतृत्व में महायुती का साथ दीजिये.***

महाविकास आघाडीवर टीका करताना माविआच्या सगळ्या योजना या सत्ताप्राप्तीसाठी असल्याचं अमित शाह म्हणाले. राज्यातील नेते-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह पक्षाचे केंद्रासह राज्यातील मंत्री आणि नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते.

महाविकास आघाडी जाहीरनामा

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महाविकास आघाडीचा जाहीरनामा आज मुंबईत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्याला 'महाराष्ट्रनामा' असं नाव देण्यात आलं आहे. यावेळी महाविकास आघाडीत सहभागी असणाऱ्या सर्व राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते. मुंबईत जाहीर केलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित हा सविस्तर जाहीरनामा प्रकाशित करत असल्याचं मल्लिकार्जुन खर्गे यावेळी म्हणाले.

***(होल्ड बाईट -४० सेकंद - खरगे)***

***महाराष्ट्र के लोग भयाव इन्फ्लेशन, महिला और बालकाओ के खिलाप बढ़ रही हिंसा तथा किसानों की बुरी दशा में पीड़ित है । महाराष्ट्र की प्रगति और विकास के लिए हमारा व्हिजन पाँच मुख पिल्लर्स है । एक खेतीबाड़ी और ग्रामीण विकास, उद्योग और रोजगार, शहरी विकास, पर्यावरण तथा जनकल्याणपर आधारित है । महाराष्ट्र की तरक्की और खुशहाली के लिए हम अपना म्यानिफिस्टो महाराष्ट्रनामा आपके समक्ष रखते है, ये हमारा सभी का संकल्प है ।***

महिलांसाठी महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून महिन्याला तीन हजार रुपयांची मदत, एसटी बसमधून मोफत प्रवास, विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण, बेरोजगार तरुणांना महिन्याला ४ हजार रुपये, शेतकऱ्यासाठी कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान, २५ लाखापर्यंत आरोग्य विमा या पंचसूत्रीसह पहिल्या १०० दिवसात करण्यात येणारी कामं आणि जातनिहाय जनगणना करण्याचं आश्वासन देण्यात आलं. याशिवाय ५०० रुपयात वर्षात सहा सिलिंडर, महिला सुरक्षेसाठी शक्ती कायद्याची अंमलबजावणी, १०० युनिट पर्यंत वीजबिल मोफत, रोजगार निर्मितीसाठी नवीन औद्योगिक धोरण, अडीच  लाख सरकारी रिक्त पदांची भरती, कंत्राटी भरती धोरणाला स्थगिती, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना तसंच युवा आयोगाची स्थापना करण्यावर या महाराष्ट्रनाम्याचा भर आहे. समृद्ध आणि आनंदी शहरं तयार विविध प्रकारची आश्वासने महाराष्ट्रनामा या महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात देण्यात आली आहे.

अमित शहा प्रचार सभा

दिनांक २० नोव्हेंबर रोजी होणारी विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यासाठी राज्यातील सर्व प्रमुख पक्षांनी तसंच अपक्ष उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढविला आहे. सोबतच समाजमाध्यमांचा देखील प्रभावी प्रचारासाठी उपयोग करण्यात येत आहे. महाविकास आघाडी फक्त मतांचं राजकारण करते. ही आघाडी कोणतीही गॅरंटी पूर्ण करू शकत नाही, अशी टीका भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. बुलढाणा जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मलकापूर इथं आयोजित सभेला ते आज संबोधित करत होते. देश आणि राज्य विकसित होण्यासाठी महायुतीला मतदान करण्याचं आवाहन त्यांनी जनतेला केलं. अमरावती जिल्ह्यात वरुड इथं देखील त्यांनी जाहीर सभेला संबोधित केलं. मोर्शी विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी अजित पवार  गटाचे विद्यमान आमदार देवेन्द्र भुयार आणि भाजपचे उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्यात मैत्रीपूर्ण लढत असली, तरी भाजपला मतदान करण्याचं आवाहन शाह यांनी केलं.

गडकरी राळेगाव सभा

भाजप संविधान बदलणार असा खोटा प्रचार काँग्रेस करत आहे. वास्तविक  संविधानातील लोकतंत्र, समाजवाद, धर्मनिरपेक्षता ही मूलभूत तत्त्वं कुणीही बदलवू शकत नाही. मात्र स्वतःच्या सोईकरिता काँग्रेसने संविधानाचा गैरवापर केला असल्याची  टीका केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यवतमाळच्या राळेगाव इथल्या सभेत केली. भाजप उमेदवार अशोक उईके याच्या प्रचारार्थ गडकरींनी आज  सभा घेतली. काँग्रेस मुसलमानांना देखील खोट्या प्रचारातून भरकटविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जातिवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर रहा, असं आवाहन गडकरी यांनी केलं.

मोदी चंद्रपूर दौरा

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर इथं जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. सभेला होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि सुव्यवस्था राखण्यासाठी काही वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे.

नागपुरातील प्रचार सभा

नागपुरात आज देखील विविध पक्षांच्या प्रचारसभा होणार आहेत.  आज भाजपचे ज्येष्ठ नेते आणि  केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रचार सभा सायंकाळी साडेसहा वाजता गड्डी गोदाम इथं  तर सायंकाळी साडेसात वाजता मेहंदीबागेत आणि रात्री साडेआठ वाजता लालगंज झाडे चौक इथं  आयोजित करण्यात आली आहे,  तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज बारा सिग्नल इथं आयोजित जाहीरसभेला रात्री नऊ वाजता संबोधित करणार आहेत. बहुजन मुक्ती पार्टी राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे अध्यक्ष वामन मेश्राम यांची देखील आज जाहीर सभा होणार आहे. ही सभा बाळासाहेब ठाकरे चौक, नंदनवन इथं सायंकाळी सहा वाजता नियोजित आहे.

मतदान जनजागृती

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं, याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र होत आहेत. निवडणूक आयोग आणि केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे जनजागृती करणारी वाहनं राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये पाठवण्यात आली आहेत. ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था - संघटनांमार्फत मॅरेथॉन, प्रदर्शन, कार्यशाळा असे कार्यक्रम होत आहेत.

द्वितीय खर्च लेखे तपासणी

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विधानसभा मतदार संघ  नागपूर दक्षिण पश्चिम, नागपूर दक्षिण, नागपूर पूर्व, नागपूर मध्य, नागपूर पश्चिम आणि नागपूर उत्तर मतदार संघातून निवडणूक लढविणा-या उमेदवाराचे द्वितीय खर्च लेखे तपासणी उद्या दिनांक ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते ५ या वेळात बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर इथं  तसंच विधानसभा मतदार संघ काटोल, सावनेर, हिंगणा, उमरेड, कामठी आणि रामटेक मतदार संघातून निवडणूक लढविणा-या उमेदवाराची द्वितीय खर्च लेखे तपासणी उद्या सरपंच भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर इथं आयोजित करण्यात आली आहे.

हयातीचा दाखला

सरकारी निवृत्तीवेतन घेणाऱ्या लाभधारकांना दरवर्षी नोव्हेंबर ते डिसेंबर या दोन महिन्यांच्या कालावधीत निवृत्तीवेतन जमा करणाऱ्या बँकेत जाऊन हयातीचा दाखला द्यावा लागतो. यासाठी आता टपाल खात्याने पोस्ट पेमेंट बँकेमार्फत  घरपोच जीवन प्रमाणपत्र अर्थात हयातीचा दाखला देण्याची सुविधा सुरू केली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनधारक त्यांच्या पोस्टमन किंवा जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधू शकतात. याशिवाय 'पोस्ट इन्फो' हे ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये 'सर्व्हिस रिक्वेस्ट' हा पर्याय वापरून  जीवन प्रमाणपत्रासाठीची विनंती नोंदवू शकतात. या विनंतीप्रमाणे पोस्टमन पेन्शनरच्या घरी येऊन आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे जीवन प्रमाणपत्र जारी करेल. हा लाभ मिळविण्यासाठी पेन्शनर पोस्ट ऑफिसचा ग्राहक असायलाच हवा, असं कुठलंही बंधन नाही. त्यामुळे कुठलाही पेन्शनधारक या सुविधेचा लाभ घेऊ शकणार आहे.

*****